साईसंस्थानच्या रुग्णालयात नव्या सॉफ्टवेअरची जुनी त्रुटी

रुग्ण, डॉक्टर आणि कर्मचारी तिघांचीही डोकेदुखी वाढली- कैलास कोते

शिर्डी (प्रतिनिधी)– श्री साईबाबा संस्थानच्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयात अलीकडेच सुरू करण्यात आलेल्या नवीन सॉफ्टवेअर प्रणालीने रुग्णसेवेऐवजी गोंधळाचेच वातावरण निर्माण केले आहे. या सिस्टीमच्या त्रुटी, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव, इंटरनेट कनेक्टिव्हिटीतील अडचणी आणि डॉक्टर व कर्मचाऱ्यांची वैफल्यता यामुळे रुग्णालयातील व्यवस्थापनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची टीका करत याबाबत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याबरोबर चर्चा करणार असल्याचे साई संस्थानचे माजी विश्वस्त व माजी नगराध्यक्ष कैलास कोते यांनी केली.

रुग्णांच्या उपचारासाठी डॉक्टरांना आता सॉफ्टवेअरच्या चक्रव्यूहात अडकावे लागत आहे. बहुतेक डॉक्टरांना सॉफ्टवेअर वापरण्याचे प्रशिक्षणच दिले गेलेले नाही. सॉफ्टवेअरमध्ये अनेक तांत्रिक अडचणी असून, त्याची सेवा पुरवणाऱ्या कंपनीकडून पुरेसा स्टाफही यासाठी उपलब्द करून दिला नाही. सॉफ्टवेअर प्रणाली ही डॉक्टर व रूग्णांच्या हीतासाठी असली तरी त्यासाठी संगणकाचे ज्ञान असलेले कर्मचारी साई संस्थानकडे उपलब्ध नाही. परिणामी डॉक्टर व रूग्ण या दोघांनाही सॉफ्टवेअर कंपनीच्या प्रतिनिधींना शोधण्यासाठी धावपळ करण्याचा प्रकार दुदैवी आहे. या सर्व प्रकारामुळे रुग्ण सेवा विस्कळीत झाली असून, तक्रारी वाढत आहेत. कोणाच्या बालहट्टामुळे हा पोरखेळ सुरू झाला आहे. हे रूग्णांना कळायलाच हवे, अशी टीका कैलास कोते यांनी केली.

संस्थानच्याच औषधांचा दर्जा कमी असल्याची चर्चा सर्वत्र आहे तसीच ती डॉक्टरांमध्ये आहे. राज्य सरकार सरकारी रूग्णालयांकडून ज्या एजन्सीकडून औषधांची खरेदी होते. त्या एजन्सी मार्फत साईसंस्थान अधिकारी औषधे खरेदी का करित नाही. या मागचे गौडबंगाळ काय आहे याचा खुलासा होणे गरजेचे आहे. एल वन प्राईजने खरेदी केलेली औषधांचा दर्जा बाबत रूग्णालयातील डॉक्टरांनाही शंका आहे मग याच औषधांचा रूग्णांना आग्रह का? बाहेरची दर्जेदार औषधे का नको? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. याशिवाय रक्ततपासणी अहवालांमध्ये सुद्धा अचूकतेचा अभाव दिसून येतो, हे गंभीर आरोग्य धोक्याचे लक्षण मानले जात आहे. साई संस्थान कर्मचाऱ्यांना संस्थानमार्फत मोफत उपचार सुविधा असताना त्यांना महात्मा फुले योजनेखाली आणण्याची गरज काय होती? हे कोणत्या सूडभावनेतून केले गेले? असा सवाल करत कोते यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्यावर थेट आरोप केला. रुग्णालयात टेक्निकल कर्मचाऱ्यांचे शैक्षणिक प्रमाणपत्र तपासले गेलेले नसल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे अशिक्षित किंवा अपात्र कर्मचारी रुग्णांच्या जीवाशी खेळत असल्याची भीती व्यक्त होत आहे. सर्वसामान्य रुग्ण आणि कर्मचाऱ्यांची सेवा ऑक्सिजनवर नेण्याचा अधिकार सीईओ यांना कोणी दिला? रुग्णसेवेचे विघटन करणाऱ्यांवर कारवाई का होत नाही? असा थेट सवाल कोते यांनी उपस्थित केला आहे. साई संस्थान सारख्या श्रद्धास्थळाशी आरोग्य सेवेमध्ये सुरू असलेली अव्यवस्था, नुसती प्रशासकीय अकार्यक्षमता नसून जनतेच्या विश्वासाशी गद्दारी आहे. सीईओ गाडीलकर यांनी याची गंभीर दखल घेणे गरजेचे आहे. अन्यथा साईसंस्थान सारख्या सेवाभावी संस्थेची प्रतिमा डागाळण्याची जबाबदारी केवळ प्रशासनावरच राहील असा इशारा कैलास कोते यांनी दिला.

नागरिकांना शुद्ध पाणी देण्याचा जिल्हा परिषदेचा निर्धार

१५७५ गावांमध्ये पाणी गुणवत्ता तपासणी व जनजागृती मोहीम

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– जिल्ह्यातील नागरिकांना शुध्द व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने मोठ्या प्रमाणावर पाणी गुणवत्ता तपासणी व जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत ७ जून २०२५ पर्यंत जिल्ह्यातील सर्व १५७५ गावांमध्ये क्षेत्रीय तपासणी संच (एफ.टी.के.) च्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची रासायनिक व जैविक तपासणी करण्यात येणार आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी या अभियानाचा बुधवारी शुभारंभ केला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, प्रत्येक नागरिकांना शुध्द पाणी मिळावे यासाठी प्रशासन कटिबध्द आहे. गावपातळीवर थेट नागरिकांच्या सहभागातून पाण्याची तपासणी करून जनजागृती करणे हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, सुभाष सातपुते, दादाभाऊ गुंजाळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे तसेच सर्व गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी उपस्थित होते. पाणी गुणवत्ता तपासणी मोहिमेअंतर्गत केंद्र शासनाच्या सूचनेनुसार गावपातळीवर एफ.टी.के. संचाचा वापर करून रासायनिक व जैविक तपासणी केली जाणार आहे. गावागावांमध्ये पूर्वनियोजित पध्दतीने पाच महिलांची निवड व त्यांची पडताळणी करण्यात आली असून, त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासोबतच आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांना एफ.टी.के. संचाचा वापर करून पाण्याची तपासणी करण्याचे प्रात्यक्षिक देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या मदतीने शाळा, अंगणवाड्या व घरगुती नळजोडणीच्या पाण्याचे नमुने गोळा करून तपासले जातील. तपासणीचे सर्व नोंदी 'डब्ल्यूक्यूएमआयएस' या पोर्टलवर अपलोड केल्या जातील. नळ पाणीपुरवठा योजनांचे पाणी स्त्रोत, शाळा, अंगणवाड्या व घरगुती नळजोडण्यांची तपासणी एफ.टी.के.च्या माध्यमातून करण्यात येईल. गावपातळीवरील नागरिकांमध्ये पाण्याच्या गुणवत्तेबाबत जागरूकता निर्माण होण्यासाठी विशेष जनजागृती उपक्रमही राबविण्यात येणार आहेत.

सर्व विभागांचा समन्वय

या मोहिमेमध्ये ग्रामपंचायत विभाग, महिला व बालकल्याण विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग व पाणीपुरवठा विभाग यांचा समन्वय साधून एकत्रितपणे कार्य करण्यात येणार आहे. जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायत पातळीवर या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित केली जाणार आहे. सर्व शासकीय यंत्रणांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन सीईओ येरेकर यांनी यावेळी केले.

एफ.टी.के. म्हणजे काय?

एफ.टी.के. हा एक पोर्टेबल तपासणी संच आहे. याच्या साहाय्याने पिण्याच्या पाण्यातील पीएच स्तर, क्लोरिन, नायट्रेट्स, फ्लोराइड, क्लोराईड, लोह, अल्कॉलिनिटी, गढूळपणा, हार्डनेस, कॅल्शिअम, मॅग्नेशिअम यांसारखे विविध घटक तसेच जैविक प्रदूषण तात्काळ तपासता येते. या उपकरणामुळे गावपातळीवरच पाण्याची शुध्दता तपासणे शक्य होते व आवश्यक उपाययोजना वेळीच करता येतात.

निवृत्ती बोंबले यांचे निधन

श्रीरामपूर (प्रतिनिधी)– तालुक्यातील गोंधवणी येथील रहिवासी व श्रीरामपूरमध्ये जुन्या काळात कार डेंटींग ॲन्ड पेंटींग व्यवसायात नावाजलेले निवृत्ती बाबुराव बोंबले उर्फ बोंबले मिस्तरी (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगी, जावई, एक भाऊ, भावजयी, दोन पुतणे, पुतण्या, सुना, नातवंडे असा परिवार आहे. नाशिक येथील इंडियन सिक्युरिटी प्रेस हॉस्पिटलच्या व्यवस्थापक सौ. मिनाक्षी जयराम गाडेकर यांचे ते वडील, ज्ञानदेव बोंबले यांचे बंधू तर अशोकनगर फाटा येथील कार डेंटींग ॲन्ड पेंटींग व्यावसायिक संजय बोंबले व शांताराम बोंबले यांचे चुलते होत.

भूछत्र सोडून गेल्याने त्याचा सूर्यावर परिणाम होत नाही- डांगे

कोपरगाव (प्रतिनिधी)– काही भूछत्र सोडून गेल्याने त्याचा सूर्यावर परिणाम होत नाही. तसाच काही पदाधिकारी गट सोडून गेले म्हणून कोल्हे गटावर परिणाम होणार नाही, या उलट जोमाने पक्षवाढीसाठी अनेकांना संधी मिळाली आहे, असा ठाम विश्वास ज्येष्ठ ग्रामपंचायत सदस्य विजय डांगे यांनी व्यक्त केला.

काकडी ग्रामपंचायतीच्या राजकारणात सध्या वैयक्तीत स्वार्थापोटी काही पदाधिकाऱ्यांच्या दलबदलामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर भाष्य करताना कोल्हे गटाचे ज्येष्ठ ग्रामपंचायत सदस्य विजय डांगे म्हणाले, युवानेते विवेक कोल्हे यांनी अनेक व्यक्तींना शून्यातून सत्तेच्या गादीवर बसवले. ज्यांचा सामाजिक आधार फारसा नव्हता. त्यांनी गावच्या विकासासाठी कोल्हे गटात राहून काम केल्याचे नाटक केले. पण प्रत्यक्षात मात्र स्वार्थाचा भोपळा फोडत आपली खोटी ओळख निर्माण केली. जी सध्याच्या घडल्या प्रकाराने उघड पडली आहे. कोल्हे कुटुंब हे केवळ राजकीय नेतृत्व नव्हे, तर कार्यकर्ते घडवण्याचे केंद्र आहे. आजवर अनेक कार्यकर्त्यांना अन्य गटांनी फोडाफोडीतून आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न केला त्यावरच स्वतःचे राजकारण जोपासले. मात्र संधीसाधू हे केवळ हंगामी भूछत्र असून पावसाळा संपला की नाहीसे होतात, तशीच या दलबदलूंचीही अवस्था होणार आहे. गावाच्या विकासासाठी निःस्वार्थ काम करणाऱ्या विवेक कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली आजही असंख्य कार्यकर्ते एकनिष्ठपणे उभे आहेत. याचबरोबर उपकार विसरणाऱ्यांची प्रवृत्ती ही समाजात दीर्घकाळ टिकत नाही, असा टोला विजय डांगे यांनी लगावला. राजकारणात सत्तेच्या मोहापेक्षा निष्ठा, मूल्य आणि सेवा महत्त्वाची असते. हे विसरून स्वतःच्या वैयक्तीत स्वार्थासाठी पाऊल उचलणाऱ्यांना काकडी ग्रामस्थ वेळच योग्य उत्तर देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

बिहारच्या राजकारणातही 'लाडकी बहीण' ठरणार निर्णायक?

पटना– लवकरच बिहारमध्ये निवडणुकांचे बिगुल वाजणार आहे. यामुळे राजकीय हालचालींना वेग आला आहे. या २०२५ वर्षाच्या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीवर सर्वांचे लक्ष लागले आहे. राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरु केली असून बिहारमध्ये निवडणूकीचे वारे वाहत आहेत. भाजप आणि काँग्रेस पक्षाने आश्वासनांची रांग लावली असून मतदारांच्या मनात घर करण्याचे काम राजकीय पक्ष सुरु आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीप्रमाणे बिहारमध्ये देखील महिलांना आकर्षित करणाऱ्या योजना जाहीर केल्या जात आहेत.

बिहार निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, काँग्रेस पक्षाने त्यांच्या जाहीरनाम्याचा पहिला भाग प्रसिद्ध केला आहे, ज्याला काँग्रेस गॅरंटी असे नाव देण्यात आले आहे. काँग्रेसची पहिली हमी ही महिलांसाठी देण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्राप्रमाणे बिहारमध्ये देखील महिलांवर लक्ष्य करणाऱ्या योजना जाहीर झाल्या आहेत.

विजय निकम यांचा कार्यगौरव पुरस्काराने सन्मान

श्रीरामपूर (प्रतिनिधी)– येथील विजय महादू निकम यांना शिर्डी येथे महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या कार्यक्रमात कार्यगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष सयाजीराव झुंजार, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, काकासाहेब कोकाटे, उत्तर जिल्हाध्यक्ष योगेश शिंदे, बाळासाहेब व्यवहारे, संजय बिडवे, सुनील गायकवाड शशिकांत सोनवणे, शांताराम राऊत, नंदकुमार मोरे, विकास मदने, कैलास भागवत, बाळासाहेब कणसे, चांगदेव जाधव, पाडुरंग वाघमारे, पोपटराव वाकचौरे, बाबासाहेब अहिरे, सुभाष महाले, यांचे उपस्थितीमध्ये प्रदान करण्यात आला.

पान १ वरुन

मान्सूनपूर्व पावसाचा धुडगूस सुरूच

झाला आहे. गेल्या काही दिवसांतील वादळ व अवकाळी पावसामुळे आंबा, डाळिंब, मोसंबी, संत्रा, चिकू, लिंबू व केळी या फळबागांना मोठा फटका बसला आहे. मका, टोमॅटो, कांदा, मिरची व उन्हाळी बाजरीच्या पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

शेतकऱ्यासांठी महाविस्तार-ॲप उपलब्ध

राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक पार पडली. या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना फडणवीस यांनी यावर्षी राज्यात बि-बियाण्यांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती दिली. बोगस बियाण्यांना आळा घालण्यासाठी यावर्षीपासून सत्यप्रत बियाणे केंद्र सरकारच्या साथी पोर्टलवर नोंदवावे लागणार आहे. त्यामुळे बोगस बियाण्यांचा प्रश्नही सुटणार आहे. कर्ज देताना शेतकऱ्यांना सिबिलची सक्ती करणाऱ्या बँकांवर देखील कारवाई करण्यात येणार असल्याचा पुनरुच्चार फडणवीस यांनी यावेळी केला.

राज्यात पुरेशा प्रमाणात खते उपलब्ध असून खतांचा तुटवडा पडणार नाही. मागील वर्षाचा कल पाहता कोणते पीक कमी अधिक प्रमाणात घेता येईल याचा विचार करूनच बियाण्यांची उपलब्धता करण्यात आली आहे. बोगस बियाणे रोखण्यासाठी केंद्राच्या साथी पोर्टलवर नोंदणी करावी लागणार आहे. यामुळे बियाण्यांचे नेमके उत्पादन कुठे झाले हे शोधता येते. या सत्यप्रत बियाण्यांना देखील आता केंद्राच्या साथी पोर्टलवर नोंदवावे लागणार आहे. केंद्राने आपले पाहून इतर राज्यांना हा नियम करायला सांगितला आहे. सध्या ७० हजार क्विंटल बियाणे पोर्टलवर उपलब्ध आहे. पुढील वर्षपासून १०० टक्के सत्यप्रत बियाणे साथी पोर्टलवर येईल. त्यामुळे बोगस बियाणे बंदच होईल, असे फडणवीस यांनी सांगितले.

प्रत्येक कृषी केंद्राच्या बाहेर खत लिंकिंगच्या संदर्भात फलक लागणार आहे. या फलकावर लिंकिंग संदर्भात शेतकऱ्यांना तक्रार करण्यासाठी नंबर असेल. पुरवठादार कंपन्यांनी लिकिंगची सक्ती केली तर त्यांच्यावर जीवनावश्यक वस्तू कायद्याच्या अंतर्गत कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

कृषी विभागाने विकसित केलेल्या ममहाविस्तार एआय अँप; चे लोकार्पण आज करण्यात आले. याबाबतची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. महाविस्तार ॲपवर शेतीबाबत सगळी माहिती उपलब्ध असणार आहे. हा प एआय आधारित असून शेतीचे सर्व व्हिडिओ त्यात उपलब्ध असतील. लागवडीपासून ते कीड व्यवस्थापनापर्यंतची सर्व माहिती या पमध्ये आहे. मराठीत चॅटबॉट देखील त्यात आहे. शेतकऱ्याने कोणताही प्रश्न विचारला तर त्यात त्याचे उत्तर मिळेल. हा ॲप शेतकऱ्याचा डिजिटल मित्र असून तो गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. लवकरच हा चॅटबॉट व्हॉटसपवर देखील आणू. कोणत्या बाजारपेठेत शेतमालाचे भाव काय आहेत याची रिअलटाईम माहिती शेतकऱ्याला पमधून मिळू शकते, असे फडणवीस म्हणाले.

केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना...

योजना (एनपीएस) ट्रस्टने युनिफाइड पेन्शन योजनेसाठी कॅल्क्युलेटर सादर केले आहे. हे कॅल्क्युलेटर एनपीएस आणि यूपीएस च्या ग्राहकांना त्यांच्या निवृत्तीवेतनाबाबतचा अंदाज प्रदान करते. हे कॅल्क्युलेटर भागधारकांना काळजीपूर्वक विचार करून योग्य पेन्शन योजना निवडण्यास मदत करेल. यूपीएस शी संबंधित नियमावली अलीकडेच १ एप्रिल २०२५ पासून लागू झाली आहे. या नियमांमुळे विद्यमान केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसह १ एप्रिल २०२५ रोजी किंवा त्यानंतर केंद्र सरकारी सेवेत भरती झालेल्या कर्मचाऱ्यांची एनपीएसमध्ये नोंदणी शक्य होते.

यूपीएस खात्रीशीर निवृत्तीवेतनाची हमी

यूपीएस, या नव्या निवृत्तीवेतन योजनेत खात्रीशीर निवृत्तीवेतन मिळेल याची हमी देण्यात येते. यानुसार निवृत्तीवेतन रकमेचा दर निवृत्तीपूर्वीच्या १२ महिन्यांच्या सरासरी मूळ वेतनाच्या ५० टक्के आणि किमान २५ वर्षांच्या पात्रता सेवेच्या अधीन असेल. कर्मचाऱ्याच्या मृत्यूपूर्वी त्याच्या कुटुंबाला त्याच्या निवृत्तीवेतनाच्या ६० टक्के रक्कम मिळेल. किमान १० वर्षांच्या सेवेनंतर निवृत्तीनंतर दरमहा १०,००० रुपये निवृत्तीवेतनाची हमी दिली जाते. नव्या यूपीएस योजनेत ग्रॅच्युइटी व्यतिरिक्त, निवृत्तीनंतर एकरकमी रक्कम देण्याची तरतूद देखील आहे.

कर्मचाऱ्यांचे योगदान आणि सरकारचे योगदान

कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ वेतन आणि महागाई भत्त्याच्या १० टक्के योगदान द्यावे लागेल, तर नियोक्त्याचे (केंद्र सरकार) योगदान १८.५ टक्के असेल. केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्याला काढून टाकल्यास, काढून टाकल्यास किंवा राजीनामा दिल्यास मात्र यूपीएस किंवा निश्चित निवृत्तीवेतनाचा पर्याय उपलब्ध राहणार नाही.

जिल्हा बँक भरतीप्रकरणी...

यानंतर उत्तरपत्रिकेची मूळ प्रत याचिकाकर्त्यांनी बँकेकडे मागितली होती. परंतू त्यांना बँकेने प्रत दिली नाही. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनाही अर्ज करून निदर्शनास आणून दिले त्यांनीही कार्यवाही केली नाही.

यानंतर विशाल गोरे आणि राजेंद्र वैराळ यांनी छत्रपती संभाजीनगर खंडपीठात धाव घेतली. याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार वरील भरती प्रक्रियेमध्ये गुणवत्ता यादी जाहीर करणे गरजेचे होते. बँकेने गुणवत्ता यादी जाहीर न करता फक्त आसन क्रमांक प्रसिद्ध करून मुलाखत व अंतिम यादी प्रसिद्ध केली. या भरतीमध्ये बँकेचे अध्यक्ष व संचालक मंडळाने त्यांच्या मर्जीतील विद्यार्थ्यांना जास्त गुण दिले. ही भरती प्रक्रिया फक्त देखावा असून बँकेचे अध्यक्ष आणि संचालक मंडळाने त्यांच्या संपर्कातील उमेदवारांना पात्र केले आहे. या भरती प्रक्रियेत आरक्षण लागू केले नाही. सहकारी बँकांसाठी राज्यस्तरीय कृती दलाने दिलेल्या सूचनांचे पालन केलेले नाही. त्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिया बेकायदा असल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे. ही प्रक्रिया रद्द करण्याची विनंती देखील याचिकाकर्त्यांनी न्यायालयाकडे केली. न्यायमूर्ती अरुण पेडणेकर यांनी याचिकाकर्त्यांची दखल घेत संबंधितांना नोटीस बजाविण्याचा आदेश काढला. ॲड. योगेश खालकर आणि ॲड.निलेश भागवत यांनी याचिकाकर्त्यांतर्फे तर ॲड. एस. पी. सोनपावले यांनी सरकारतर्फे न्यायालयात काम पाहिले.

आनंद भंडारी झेडपीचे नवे सीईओ

कारभार करता आला. यापूर्वी दोनदा सरकारकडून येरेकर यांच्या बदलीचे आदेश काढण्यात आले होते, यात पहिल्यांदा पुण्यात परिवहन प्राधिकरणाचे प्रमुख म्हणून नेमण्यात आले होते. त्यानंतर त्यांची ठाणे जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर बदली करण्यात आली होती, मात्र मंत्रालय पातळीवरून येरेकर यांच्या बदलीचे आदेश थांबवण्यात आले होते. त्यानंतर गेल्या दोन ते तीन महिन्यापासून येरेकर यांच्या बदलीच्या आदेश निघणार याबाबत चर्चा होती. अखेर बुधवारी सायंकाळी राज्य सरकारच्या वतीने राज्यातील आठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश निघाले आहेत. यात येरेकर यांच्या जागी पुण्याहून भूमी अभिलेख विभागातून आनंद भंडारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर येरेकर यांची पदोन्नतीने अमरावती जिल्हाधिकारी पदावर पदोन्नतीने बदली करण्यात आली आहे.

लंकेंशी संघर्ष तर पालकमंत्र्यांशी जवळीक

नगर जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर काम करत असताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार निलेश लंके यांच्याशी मुख्य कार्यकारी अधिकारी येरेकर यांच्याशी एका प्रकारे घोषित संघर्ष झाला. मात्र या संघर्ष नंतरही न डगमगता येरेकर यांनी कामाचा धडाका सुरू ठेवला. दरम्यान पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी येरेकर यांची जवळीक असल्याचे अनेक वेळा सांगण्यात आले. जिल्हा परिषदेत अनेक नाविन्यपूर्ण योजना राबवण्यात येरेकर यांचा मोलाचा वाटा होता. नगर सारख्या राजकीय व सामाजिकदृष्ट्या जागरूक असणाऱ्या नगर जिल्ह्यात येरेकर यांनी तीन वर्ष यशस्वी काम केले.

बहीण-भावाचा तलावात बुडून मृत्यू

या बहिण भावाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. साहील व दिव्या यांच्या पश्चात वडील प्रशांत, आई, एक बहिणी, आजी, आजोबा असा परिवार असून वडील प्रशांत हे शेतीबरोबरच शिर्डीत फुल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतात. साहील व दिव्या हे श्रीगणेश इंटरनॅशनल स्कुलमध्ये शिक्षक घेत होते. दोघेही अतिशय हुशार होते. दिव्या नुकतीच दहावी उत्तीर्ण होऊन ११ वीत प्रवेश घेतला होता. मितभाषी व हुशार असलेल्या दिव्याने आपल्या भावाला वाचविताना स्वतः च्या जीवाचा विचार केला नाही. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. साहील व दिव्याचा मृतदेह बाहेर काढल्यानंतर त्यांच्या आई-वडिलांनी एकच हंबरडा फोडला.ते पाहून जमलेल्या गर्दीलाही अश्रु अनावर झाले.

भंडारदरा पाणलोटात पूर्वमोसमी पाऊस

या तलावात कालअखेर ५४.५१ दलघफू (४८.३८टक्के) पाणी होते. यंदा आढळा धरणातही समाधानकारक साठा आहे. एव्हाना उन्हाळ्यात या धरणातील पाणीसाठा तळ गाठतो. पण यावेळी जवळजवळ ५० टक्के पाणीसाठा या धरणात आहे. १०६० दलघफू क्षमतेच्या या धरणात ४९४ दलघफू (४६.६० टक्के) पाणीसाठा आहे. काल सकाळी संपलेल्या २४ तासांत पडलेला पाऊस असा (मिमी) भंडारदरा २४, घाटघर ९, पांजरे ११, रतनवाडी १२, वाकी २०, अकोले ५.

आता २०० रुपयातच होणार...

येत होते. हे शुल्क आता थेट २०० रुपयांवर आणण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा मोजणी खर्च वाचणार आहे.

जमीन मोजणी प्रक्रिया ऑनलाईन

भूमि अभिलेख कार्यालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करता येते. पूर्वीसारख्या कार्यालयात खेटा मारण्याची गरज नाही. एका क्लिकवर काही कागदपत्रांसह शुल्क भरून जमीन मोजणीसाठी अर्ज करता येतो. केवळ २०० रुपये मोजणी शुल्क भरून एकत्र कुटुंबाच्या जमिनीचे नोंदणीकृत वाटणीपत्र व नकाशे देण्याचा अतिशय महत्त्वाचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यायांचा मोजणी खर्च वाचणार आहे.

तीन प्रकारे होते मोजणी

साधी मोजणी –साधी मोजणीला जास्त काळ लागतो. सहा महिन्यांत ही मोजणी करण्यात येते. सरकार दरबारी त्यासाठी १००० रुपये जमीन मोजणी शुल्क जमा करावे लागते.

जलद मोजणी –शेतकऱ्याला जर जमिनीची जलद मोजणी करायची असेल तर २००० रुपये भरावे लागतात. तरीही या मोजणीसाठी तीन महिन्यांची प्रक्रिया आहे.

अतिजलद मोजणी–या मोजणीसाठी शेतकऱ्याला ३००० रुपये जमा करावे लागतात. जलद मोजणीसाठी तीन महिने तर अतिजलद मोजणीसाठी एक हजार रुपये अधिक द्यावे लागतात.

आंतरजातीय, आंतरधर्मीय

शासनाने एक निर्णायक आणि महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. प्रेमविवाह, आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांसाठी नवे धोरण जाहीर केले आहे.

या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, जोडप्यांच्या सुरक्षिततेपासून ते कायदेशीर मदतीपर्यंत, तात्पुरते निवास (सेफ हाऊस) आणि पोलिस संरक्षण यांसारख्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या २०१८ च्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर ही मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आली असून, त्याची अंमलबजावणी राज्यभरात सुरू करण्यात आली आहे. यासोबतच, प्रत्येक जिल्हा स्तरावर पोलिस अधीक्षक किंवा आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विशेष कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. या विशेष कक्षात जिल्हा समाज कल्याण अधिकारी तसेच महिला आणि बाल कल्याण अधिकारी यांचाही समावेश करण्यात आला आहे. कोणतीही तक्रार दाखल झाल्यास संबंधित व्यक्तींच्या वयाची पडताळणी केली जाईल. त्यानंतर योग्य ती चौकशी करण्यात येईल आणि आवश्यकतेनुसार सुरक्षा प्रदान केली जाईल. जर जोडप्यांना सुरक्षागृहाची गरज असेल तर सुरुवातीला एक महिन्यासाठी त्यांना सुरक्षित निवास देण्याचीही तरतूद यात करण्यात आली आहे. तसेच परिस्थितीनुसार, सुरक्षित निवासांच्या कालावधीत सहा महिन्यांपर्यंत वाढ केली जाऊ शकते. या काळात पोलीस बंदोबस्ताचीही तरतूद असेल, जेणेकरून जोडप्यांची पूर्ण सुरक्षा सुनिश्चित होईल. जर प्रकरणात एखादी व्यक्ती अल्पवयीन असल्याचे आढळले, तर ते प्रकरण बालकल्याण समितीकडे वर्ग करण्यात येईल. राज्यस्तरीय डायल-११२ हेल्पलाइनवर आंतरधर्मीय किंवा आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना तक्रारी नोंदवता येतील. प्राप्त माहिती गोपनीय ठेवली जाईल, आणि जर तक्रार थेट पोलीस स्टेशनमध्ये केली गेली, तर तात्काळ सुरक्षा पुरवण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. तक्रारीनंतर गुन्ह्याची प्राथमिक चौकशी करण्यात येईल आणि गरज भासल्यास ऋखठ नोंदवली जाईल. तपासाची जबाबदारी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर असेल. सुरक्षित निवासासाठी शासकीय विश्रामगृह, रिक्त सरकारी निवासस्थान किंवा भाडेतत्त्वावर घर उपलब्ध करून दिले जाईल.

जोडप्यांना विधी सेवा, समुपदेशन), विवाह नोंदणीची सुविधा या सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत. याव्यतिरिक्त, जिल्हास्तरीय समिती दर तीन महिन्यांनी या यंत्रणेचा आढावा घेईल आणि शासनाला संबंधित अहवाल सादर करेल, असे गृह विभागाने आपल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये स्पष्ट केले आहे.

आंतरधर्मीय आणि आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे

प्रत्येक जिल्ह्यात पोलिस अधीक्षक/आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कक्ष स्थापन.

तक्रारींची नोंद, चौकशी आणि तात्काळ कारवाई.

सुरक्षा व सेफ हाऊस

सुरुवातीस १ महिना आणि गरजेनुसार ६ महिन्यांपर्यंत सुरक्षित निवास.

पोलिस संरक्षणाची तरतूद.

डायल-११२ हेल्पलाईन

संकटप्रसंगी डायल-११२ वर संपर्क करा.

तक्रारी गोपनीय ठेवल्या जातील.

अल्पवयीन प्रकरणांची खबरदारी

वयाची पडताळणी अनिवार्य.

बालकल्याण समितीकडून समुपदेशन आणि विशेष सुरक्षा.

प्राथमिक चौकशी व एफआयआर

धोका असल्यास तात्काळ एफआयआर नोंद.

तपासावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष.

सुरक्षागृहासाठी निवास व्यवस्था

शासकीय विश्रामगृह, रिक्त निवास किंवा भाडे तत्वावरील निवास.

नाममात्र शुल्कात सुविधा.

मोफत विधी सेवा व समुपदेशन

जोडप्यांना मोफत कायदेशीर सल्ला व समुपदेशनाची सुविधा.

विवाह नोंदणीची सुविधा सुरक्षागृहातच.

स्वतंत्र कक्ष (जोडप्यांसाठी)

विवाहपूर्व आणि विवाहानंतर स्वतंत्र, सुरक्षित निवासाची सोय.

जिल्हास्तरीय समितीचा त्रैमासिक आढावा

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती दर ३ महिन्यांनी आढावा घेऊन शासनाला अहवाल सादर केला जाईल.